**सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास व्ही.सी.वर :–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – गणेश शिवाजी पोतदार,

वय – ३६ वर्षे, व्यवसाय– सराफ व्यापार,

पत्ता – रा.हरीजवळगा, ता.निलंगा, जि.लातूर

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. व्ही.एन.मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–**

मी दोन वर्षापासून मदनसूरी ता. निलंगा जि. लातूर येथे विश्वकर्मा ज्वेलर्स या नावाने सराफ व्यवसाय करतो. मी कविता बाबळसूरे यांच्याकडून माझे दुकाण भाड्याने घेतले आहे. दि.२४/०३/२०२५ रोजी पहाटे ५.५० वाजण्याच्या सुमारास मला माझ्या दुकाणामध्ये चोरी झाल्याचे फोन करुन व्यंकट शेवरे यांनी कळवले. त्यांनी मला माझ्या दुकाणाचे शेटर उचकटल्याचे सांगीतले. त्यानंतर मी तात्काळ दुकाणाकडे आलो. दुकाणाचे शटर उचकटलेले होते. मी लाईट लावून पाहिले असता दुकाणातील कपाट, काऊंटरचे ड्रावर उघडे अस्ताव्यस्त पडले होते. दुकाणातील सी.सी.टी.व्ही. कॅमेराचा डि.व्ही.आर. नव्हता. दुकाणातील चांदीच्या मालाचे बॉक्स रिकामे पडले होते. त्यानंतर मी माझा भाऊ किरण सुरेश पोतदार व परमेश्वर जयपाल बिराजदार यांना फोन करुन घटनेबद्दल सांगीतले. परमेश्वर बिराजदार यांनी कासार सिरसी पो.स्टे. मध्ये फोन करुन घटना कळवली. त्यांनतर पोलिस आले. लातूर येथून फिंगरप्रींट घेण्याकरीता साहेब आले होते. त्यांनी दुकाणातील वस्तूंवरील बोटांचे ठसे तपासणी साठी घेतले. जोडवी, पैंजन, तोडे, वाळे, करदोडे, चांदीची मोड आणि गणपती व लक्ष्मीच्या मुर्ती असा चांदीचा ४ किलो ६८४ ग्रॅम दस्तएवज चोरीस गेला. त्यानंतर मी पोलिस स्टेशनमध्ये झालेल्या घटनेची फिर्याद दिली. ती तक्रार दाखवल्यास मी ओळखु

शकतो. (आता मला दि.२४/०३/२०२५ रोजीची तक्रार दाखवण्यात आली.) ती तक्रार मी दाखल केलेली असुन त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१२** देण्यात आली. त्यानंतर दि.३०/११/२०२५ रोजी पोलिसांनी मला पोलिस स्टेशनला बोलावले होते. पोलिसांनी मला माझ्या दुकाणात चोरी करणारा चोर मिळून आल्याचे सांगीतले. तसेच चोरीला गेलेले सामान मिळाल्याचे सांगीतले. त्यांनी मला चार आरोपींनी चोरी केल्याचे व त्यापैकी एक रोशनसींग टाक पकडल्याचे सांगीतले तसेच मला आरोपी दाखवला. त्यानंतर मी दिनांक ०८/१२/२०२५ रोजी पोलिसांना पुरवणी जबाब दिला होता. तो पुरवणी जबाब दाखवल्यास मी ओळखु शकतो. (आता मला दि.०८/१२/२०२५ रोजीचा पुरवणी जबाब दाखवण्यात आला.) तो पुरवणी जबाब मी दाखल केलेला असुन त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१३** देण्यात आली. चोरीस गेलेले चांदीच्या वस्तू मी ओळखु शकतो. मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात असल्याने पुढील सरतपास तहकुब केला.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.02.23 16:14:39 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**

दिनांक १६/०२/२०२६. सहदिवाणी न्यायाधीश,क.स्तर न्यायालय क्र.१,
निलंगा